MHBI110032572019

दाखल तारीख : २०/११/२०१९
नोंदणी तारीख : २०/११/२०१९
निकाल तारीख : ०२/०५/२०२६
कालावधी : ०६ वर्ष ०५ महिने १२ दिवस

भाग 'अ'
(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]

| | | |
|---|---|---|
| न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग **(**न्यायालय क्र**.**३**),** गेवराई यांचे न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारीः एच.एम. मोमीन) | | |
| (न्यायनिर्णयाची तारीख : ०२/०५/२०२६) | | |
| नियमित फौजदारी खटला क्र**.**२०३**/**२०१९ | | निशाणी क्र**.**५६ |
| गुन्हा रजिष्टर क्रमांक | | १५७/२०१९ - तलवाडा पोलीस ठाणे |
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन<br>मार्फत - पोलीस ठाणे अधिकारी,<br>तलवाडा पोलीस ठाणे,<br>ता. गेवराई, जि. बीड. |
| अभियोग पक्षातर्फे | | श्रीमती ए.टी. सय्यद, सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | १**.** | कैलास सुखदेव चव्हाण<br>वय : २७ वर्षे, रा. स्वप्न नगर परतुर,<br>ता. परतुर जि. जालना. |
| | २**.** | सुखदेव गेमाजी चव्हाण **(**मयत**) (Abated)** |
| | ३**.** | सुभद्रा सुखदेव चव्हाण**,**<br>वय : ६२ वर्षे, रा. स्वप्न नगर परतुर,<br>ता. परतुर जि. जालना. |
| | ४**.** | गणेश सुखदेव चव्हाण**,**<br>वय : २५ वर्षे, रा. वरीलप्रमाणे. |
| | ५**.** | शिवकन्या विनोद आडे**,**<br>वय : ३१ वर्षे, रा. वरीलप्रमाणे. |
| | ६**.** | शिवगिता विवेक राठोड**,**<br>वय : २९७ वर्षे, रा. नांदेड,<br>ता. जि. नांदेड. |
| आरोपींतर्फे | | श्री.एस.के.कारके, विधीज्ञ |

भाग 'ब'

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २६/१०/२०१८ ते ०८/०७/२०१९ |
| प्रथम खबरीची तारीख | २६/०८/२०१९ |
| दोषारोपपत्राची तारीख | ०६/११/२०१९ |
| दोषारोपनिश्चीतीची तारीख | १३/०१/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २०/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | ०२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०५/२०२६ |
| शिक्षेचा आदेश पारीत केल्याची तारीख | -- |

आरोपीचा तपशील

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कैलास सुखदेव चव्हाण | फौ.प्र.सं. कलम ४१अ प्रमाणे नोटीस | ०४/०८/२०२१ | भा.दं.वि. कलम ४९८-अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ | निर्दोष मुक्त केले | - | - |
| ३. | सुभद्रा सुखदेव चव्हाण | -"- | -"- | -"- | -"- | - | - |
| ४. | गणेश सुखदेव चव्हाण | -"- | -"- | -"- | -"- | - | - |
| ५. | शिवकन्या विनोद आडे | -"- | -"- | -"- | -"- | - | - |
| ६. | शिवगिता विवेक राठोड | -"- | -"- | -"- | -"- | - | - |

## न्या य नि र्ण य
(घोषीत दिनांक : ०२/०५/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४९८-अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ चे गुन्ह्यांसाठी चालविण्यात आला.

अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे -

२. फिर्यादी पुनम कैलास चव्हाण हिचे लग्न आरोपी क्र.१ सोबत दि.२१/०६/२०१८ रोजी झाले. लग्नानंतर फिर्यादी आरोपींकडे नांदणेस गेली असता तिला सुरुवातीचे दोन ते तीन महिने चांगले नांदविले. परंतु त्यानंतर आरोपींनी हॉटेल व्यवसायाचे फर्निचर खरेदी करण्यासाठी फिर्यादीस माहेरहून रु.दोन लाख घेवून ये म्हणून तिचा शारिरिक व मानसिक छळ केला. शेवटी फिर्यादीने सदर बाब तिच्या आईवडीलांना सांगितली असता त्यांनी इतर नातेवाकांना बोलावून आरोपींची समजुत काढण्यासाठी गेले असता तुमची मुलगी कशी सांभाळायची आम्ही संभळु असे म्हणून फिर्यादीच्या माहेरच्यांना अरेरावीची भाषा वापरुन त्यांना फिर्यादीला तुझया आई वडीलांकडून दोन लाख रुपये घेवून ये असे म्हणून तिचा शिवीगाळ करत उपाशीपोटी ठेवून तिचा शारीरिक व मानसीक छळ केला. दि. ०५/०७/२०१९ रोजी फिर्यादीस घरातून हाकलून दिले. त्यानंतर दि. ०८/०७/२०१९ रोजी आरोपींनी फिर्यादीच्या माहेरी आले असता त्यांना म्हणाले की, तु व्यवसायाकामी दोन लाख रुपये दे नसता कोर्टातून फारकत दे असे म्हणाले असता फिर्यादीने आई वडील यांनी आम्ही गरीब आहेत तुम्हाला ते दोन लाख रुपये कोठून देवू आमच्या मुलीला नांदण्यास घेवून जा अशी विनवणी केली असता आरोपींनी नांदविण्यास नकार देवून निघून गेले. त्यांनतर फिर्यादीने महिला तक्रार निवारण मंच, बीड येथे तक्रार दिली व तेथे त्यांची तडजोड न झाल्याने तिने दि.२६/०८/२०१९ रोजी आरोपींविरुध्द तलवाडा पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरुन ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे, तलवाडा यांनी गु.र.नं.१५७/२०१९, भारतीय दंड विधानाचे कलम ४९८-अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंदवला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक एस.जी.खाडे यांचेकडे सोपविण्यात आला. तपासी अंमलदार यांनी गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द निशाणी क्र.१० नुसार भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चीत करण्यात आले. दोषारोपातील मजकूर

आरोपींना त्यांचे मातृभाषेत समजावून सांगण्यात आला. आरोपींनी निशाणी क्र.११ ते १६ वरील निवेदनानुसार त्यांचेवरील आरोप नाकारुन संपरिक्षेची तयारी दर्शविली.

५. संपरिक्षेअंती आरोपींविरुध्द दोषसिध्ददर्शक पुरावा न आल्याने निशाणी क्र.१ वर आदेश पारित करुन आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन वगळण्यात आले.

६. अभियोग पक्षातर्फे श्रीमती ए.टी. सय्यद, सहा. सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस.के.कारके यांचा युक्तिवाद ऐकला.

७. खटल्याचे निर्णयाकरिता माझे विचारार्थ उपस्थित झालेले मुद्दे व त्यावर नोंदविलेले निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे :

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दि.२६/१०/२०१८ ते दि.०८/०७/२०१९ रोजी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस रु.दोन लाखची मागणी करुन फिर्यादीचा मानसिक व शारीरिक छळ केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | ..नाही. |
| २) | उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | ..नाही. |
| ३) | उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमानित केले जेणेकरुन, तिच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य करण्यास प्रवृत्त केले, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | ..नाही. |
| ४) | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त केले. |

## का र ण मि मां सा

८. आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे फिर्यादी आरती विनोद आडे हिची साक्ष निशाणी क्र.४५ वर नोंदविण्यात आली.

**मुद्दे क्र.१ ते ३ करिता :**

९. मुद्दे क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरिता एकत्रितपणे विवेचनासाठी घेण्यात येत आहेत.

१०. आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षास आरोपींनी फिर्यादीचा रु.दोन लाखच्या मागणीवरुन मानसिक व शारिरिक छळ करुन तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली, या बाबी प्रामुख्याने सिध्द करणे आवश्यक आहे.

११. फिर्यादी (सा.क्र.१) हिने तिचे सरतपासात असे कथन केले की, आरोपी क्र.१ हे तिचे पती, आरोपी क्र.२ हे तिचे सासरे, आरोपी क्र.३ ही सासू, आरोपी क्र.४ हा दीर, आरोपी क्र.५ व ६ हया तिच्या ननंदा आहेत. तिने पुढे असे कथन केले की, तिचे लग्न आरोपी क्र.१ सोबत दि.२१/०६/२०१८ रोजी झाले व लग्नांनतर ती आरोपींकडे नांदणेस गेली. तिने पुढे असे कथन केले की, ती सासरी नांदत असताना तिचे व आरोपींदरम्यान किरकोळ कारणावरुन वादावादी झाली होती. तिने पुढे असे सांगितले की, तिने आरोपींविरुध्द पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली होती. परंतु तिने फिर्यादीवर केवळ सही केल्याचे कथन करुन त्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली.

१२. फिर्यादी (सा.क्र.१) हिने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाचे परवानगीने सदर साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारुन तिचा सविस्तर उलटतपास घेतला. परंतु त्याद्वारे देखील अभियोग पक्षास कोणतेही फलित प्राप्त झाले नाही. उलटतपासादरम्यान फिर्यादीने मान्य केले की, तिची आरोपींसोबत आपसांत तडजोड झाली आहे.

१३. या ठिकाणी ही बाब नमूद करणे आवश्यक आहे की, फिर्यादी व आरोपी यांचे दरम्यान तडजोड झाली असून तशी तडजोड पुरसीस (निशाणी क्र.४४) दाखल केली आहे. परंतु भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा हा तडजोडपात्र नाही. त्यामुळे फिर्यादीचा पुरावा नोंदविण्यात आला. तथापि, फिर्यादी व आरोपी यांचे दरम्यान न्यायालयाचे बाहेर आपसांत तडजोड झालेली असल्याने कदाचित फिर्यादीने आरोपींविरुध्द दोषसिध्ददर्शक कथन केले नसल्याचे अनुमान निघते.

१४. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ ही स्वतः फिर्यादी असून देखील तिने फिर्यादीमधील कथनांना पुष्टी दिलेली नाही. अशा परिस्थितीत, प्रस्तुत खटल्यातील महत्वाचा कागदोपत्री पुरावा, म्हणजेच फिर्याद अभियोग पक्ष सिध्द करु शकला नाही.

१५. कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार फौजदारी खटल्यांमध्ये आरोपींवरील दोषारोप साक्षीपुराव्यांमधून निःसंशयरित्या सिध्द होणे क्रमप्राप्त असते. परंतु प्रस्तुत खटल्यामध्ये फिर्यादी व आरोपींमध्ये झालेल्या तडजोडीच्या अनुषंगाने अभिलेखावर आलेला पुरावा विचारात घेता

आरोपींनी गुन्हा केला, ही बाब सिध्द होत नाही.

१६.        एकंदरीत, वरील नमूद सर्व कारणांकरिता अभियोग पक्ष आरोपींविरुध्द निश्चीत केलेले दोषारोप संशयाच्या पलीकडे जाऊन शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. करिता, मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतात.

मुद्दा क्र.४ करिता **:**

१७.        अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेला पुरावा आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्याइतपत पुरेसा नसल्यामुळे मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष वरीलप्रमाणे नकारार्थी नोंदविण्यात आले आहेत. परिणामतः, आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र.४ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :

## आदेश

१. आरोपींची भारतीय दंड विधानाचे कलम ४९८-अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्य करण्यात येतात.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७-अ नुसार प्रत्येकी रु.१५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

MOMIN HANIF MOINUDDIN
Digitally signed by MOMIN HANIF MOINUDDIN
Date: 2026.05.02 13:36:14 +0530

दिनांक : ०२/०५/२०२६                    ( एच.एम. मोमीन )
ठिकाण : गेवराई                    न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
(न्यायालय क्र.३), गेवराई

## परिशिष्ट-१

### भाग 'क'

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]
अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | पुनम कैलास चव्हाण (नि.क्र.४५) | फिर्यादी |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

क. न्यायालयाचा साक्षीदार, असल्यास :

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी

अ. अभियोग पक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

ब. बचाव पक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

क. न्यायालयाने दिलेली निशाणी :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

ड. महत्वाच्या वस्तु :

| अ.क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

MOMIN HANIF MOINUDDIN
Digitally signed by MOMIN HANIF MOINUDDIN
Date: 2026.05.02 13:36:20 +0530

दिनांक : ०२/०५/२०२६
ठिकाण : गेवराई

( एच.एम. मोमीन )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
(न्यायालय क्र.३), गेवराई

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 02/05/2026 |
| Transcribed on | :- | 02/05/2026 |
| Checked & Signed on | :- | 02/05/2026 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer G-3, Georai.